# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक २४१-२२** **दिनांक ०६/०८/२०२२**

## रुपेश ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक ०४.०८.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोनि श्री देविदास हंडोरे यांना त्यांचे विश्वसनीय बातमीदाराकडून माहीती मिळाली की, रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट, किर्ती इस्टेट बिल्डींग, गाळा नं. २७, पहिला माळा, भाईंदर पूर्व या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला वेटरच्या नावाखाली मुलींकडून नृत्य करवुन घेत असुन, सदर नृत्य करतेवेळी सदर बारचे मालक/चालक, मॅनेजर, कॅशिअर, वेटर, वादक व ग्राहक हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहन म्हणुन त्यांचेवर चलनी नोटांची उधळण करत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोनि हंडोरे यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पंटर, बोगस ग्राहक पाठवून सत्यता पडताळुन दिनांक ०४/०८/२०२२ रोजी २३.०५ वा. छापा टाकला असता रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट या बार आस्थापनेमध्ये गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर नृत्य व अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे चालक/मालक, मॅनेजर कम कॅशियर, वेटर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना तसेच ग्राहक चलनी नोटा महिला सिंगरवर उधाळत असतांना मिळुन आल्याने बार आस्थापनाचे ०१ चालक, ०१ मॅनेजर कम कॅशियर, ०५ स्टाफ व १३ ग्राहक यांना ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाई दरम्यान ४५,७००/- रु रक्कम जप्त करण्यात आली असून सदर बाबत पोशि/१२११८ केशव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.६०९/२०२२ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये कम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१)(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. देविदास हंडोरे, मसपोनि तेजश्री शिंदे- भरोसा सेल, सफौ/रामचंद्र पाटील, पोशि/ केशव शिंदे व चा. पोहवा/सम्राट गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.